११.१३.. ठराव क. २३० दिनांक १६/१/२००२ अन्वये मौ. बालाबल येथील जूनी धर्मशाळा उतरून नवीन धर्मशाळा बांधण्याच्या रु. ४,३४,३६३/- एस्टीमेटला मंजूरी आहे. मात्र अन्य तपशिल ठरावात नाही.

११.१४.. ठराव क्र. २३२ दिनांक १६/१/२००२ अन्वये रु. ३०० /- ते ४००/- किंमतीच्या ७५ सहावारी व ४० नऊवारी साड्या विरयुध्द विधवा व विरमातांना माननीय जिल्हा अधिकाऱ्याच्या मागणीनुसार अध्यक्ष यांच्या मंजूरीने दिल्या त्यास कार्योतर मंजूरी दिली आहे.

११.१५.. ठराव क्र. ३८३ दिनांक २०/२/२००३ अन्वये ॲम्बॅसॅडर गाडी खरेदी व डीझेल खर्च मॅनेजमेंट फंडाकडेच पडणे शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक असल्याचे दिसते. तरीही आजवर शासन निर्णयाचे पालन न करता त्यांचे उल्लंघन होत आहे.

११.१६.. ठराव क्र. ३९९ दि. २७/३/२००३ अन्वये डिसें. २००१ पर्यंत देवस्थान फंडातून मॅनेजमेंट फंडाकडे एकूण २२ लाख उसनवार घेतली आहे. मात्र अहवाल दिनांक पर्यंत त्यापैकी कोणतीही वसूली झालेली नाही.

११.१७.. ठराव क्र. ४३३ दि. ७/७/२००३ अन्वये ४७ व्ही. आय. पी. ना ४७ साडया अध्यक्ष यांच्या आदेशाने दिल्या आहेत त्यास कार्योतर मंजूरी घेतलेली आहे.

११.१८.. ठराव क्र. ४३९ दि. ७/७/२००३ अन्वये श्री. बा. श्री. घोरपडे यांना रू. १,४८,०००/- अग्रीम घरबांधणीस मंजुरी दिली आहे. देवस्थान फंडातून अशी अग्रीम देणे गैर आहे.

११.१९.. ठराव क्र. १८६ दि. १७/८/२००१ अन्वये प्रेम सेल्स् ॲड सर्व्हिसेस यांच्या मागणी अर्जाप्रमाणे दि. ३१/७/२००१ पर्यंतच्या सर्व साड्या एकूण रू. ३ लाखाला विक्री केल्या त्याबाबत जाहिरात देऊन निविदा मागविल्या का ? व नसेल तर मूल्यांकन कसे केले ? सरसकट सर्व साड्या लॉटने का विकल्या ?

११.२०.. समिती सभा इतिवृत्तांतबुकाचे परिक्षण केल्यास असे निर्देशनास येते की, खालीलप्रमाणे सभा संपन्न झाल्या आहेत.

| वर्ष | सभा संख्या |
|---|---|
| १९९९-२००० | ११ |
| २०००-२००१ | ६ |
| २००१-२००२ | १० |
| २००२-२००३ | ८ |
| २००३-२००४ | ८ |

तरी सभासंख्या वाढवण्याचा विचार व्हावा.

११.२१.. समिती सभेमध्ये कोणकोणत्या विषयावर चर्चा होणार आहे याची पूर्व सुचना व्हावी याकरीता समिती सदस्यांना विषयपत्रिका विहित कालावधी पूर्वी दिल्या जातात. त्यामुळे समिती सभेसमोर येणाऱ्या प्रत्येक विषयांचा उल्लेख विषय पत्रिकेत असावा व पुरवणी विषय / ऐन वेळेचे विषय किमान असावेत हे बंधन पाळणे गरजेचे आहे. मात्र प्रत्यक्षात खालीलप्रमाणे स्थिती आढळते